नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३०० Issue - 300 | वार रविवार दि. २२ मार्च २०२६ Blow- Sunday Date 22 March 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## केंद्राकडून व्यावसायिक गॅस वाटपात वाढ

### नोंदणी करणे झाले अनिवार्य; परिस्थितीचा आढावा घेऊन पुढील निर्णय



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: हॉटेल आणि रेस्टॉरंट व्यवसायासाठी केंद्र सरकारने एक मोठा दिलासा दिला आहे. व्यावसायिक एलपीजी गॅसच्या पुरवठ्यात वाढ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय सरकारने घेतला असून, आता राज्यांसाठीचा कोटा थेट ५० टक्क्यांपर्यंत वाढवण्यात आला आहे. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाचे सचिव डॉ. नीरज मित्तल यांनी २१ मार्च २०२६ रोजी सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना पत्राद्वारे ही माहिती दिली आहे. मात्र, ही सवलत घेताना काही महत्त्वाच्या अटींचे पालन करणे व्यावसायिकांना बंधनकारक असणार आहे.

काही काळापूर्वी राज्यांना केवळ २० टक्के व्यावसायिक एलपीजीचा पुरवठा मिळत होता. त्यानंतर १८ मार्च २०२६ रोजी ईज ऑफ डूइंग बिझनेस अंतर्गत यामध्ये १० टक्क्यांची भर टाकून तो ३० टक्क्यांवर नेण्यात आला होता.

आता नव्या निर्देशानुसार, २३ मार्च २०२६ पासून आणखी २० टक्के अतिरिक्त कोटा वाढवण्यात आला आहे. यामुळे एकूण गॅस वाटप आता संकटपूर्व काळातील ५० टक्के स्तरावर पोहोचले आहे.

या वाढीव ५० टक्के वाटपाचा लाभ देताना सरकारने काही क्षेत्रांना प्राधान्य देण्याचे ठरवले आहे. यामध्ये प्रामुख्याने खालील घटकांचा समावेश असेल:

शहरातील आणि महामार्गावरील छोटे-मोठे हॉटेल्स, रेस्टॉरंट्स आणि ढाबे. २) औद्योगिक कंपन्यांमधील कॅन्टीन आणि फूड प्रोसेसिंग युनिट्स. ३) दुग्धशाळा (डेअरी) आणि अन्न प्रक्रिया उद्योग. ४) राज्य सरकार किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत चालवल्या जाणाऱ्या अनुदानित कॅन्टीन. ५) कम्युनिटी किचन आणि स्थलांतरित मजुरांसाठी दिले जाणारे ५ किलोचे एफटीएल सिलिंडर.

सरकारने हा कोटा वाढवला असला तरी त्यासाठी एक महत्त्वाची अट घातली आहे. ज्या व्यावसायिकांना हा ५० टक्के वाढीव कोटा हवा आहे, त्यांना पीएनजी म्हणजेच पाईप्ड नॅचरल गॅस कनेक्शन घेण्यासाठी तयार राहावे लागेल. ज्या भागात सिटी गॅस वितरण नेटवर्क उपलब्ध आहे, तिथे पीएनजी कनेक्शन घेण्यासाठी आवश्यक पावले उचलणाऱ्या ग्राहकांनाच या वाढीव एलपीजी कोट्याचा लाभ दिला जाईल.

आता सर्व व्यावसायिक आणि औद्योगिक गॅस ग्राहकांसाठी पेट्रोलियम कंपन्यांकडे नोंदणी करणे सक्तीचे करण्यात आले आहे. ग्राहकांना आपला व्यवसाय कोणत्या क्षेत्रातील आहे, गॅसचा वापर कशासाठी केला जातो आणि वर्षाला साधारण किती गॅसची गरज भासते, याची सविस्तर माहिती कंपन्यांकडे द्यावी लागेल. या माहितीच्या आधारे कंपन्या आपला डेटाबेस तयार करणार आहेत. तसेच, गॅसचा कोणताही गैरवापर किंवा काळाबाजार होणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचनाही राज्यांना देण्यात आल्या आहेत.

मंत्रालयाने स्पष्ट केले आहे की, सध्या हे अतिरिक्त वाटप तात्पुरत्या स्वरूपात वाढवण्यात आले आहे. पुढील काही काळ परिस्थितीचा आढावा घेतला जाईल आणि त्यानंतर नवीन अधिसूचना जारी केली जाईल. या निर्णयामुळे हॉटेल व्यावसायिकांना मोठा आधार मिळाला असून, ऐन व्यवसायाच्या काळात गॅस टंचाईची समस्या काही प्रमाणात कमी होण्यास मदत होणार आहे.

## जैन समाजाची सेवा, त्याग व अहिंसेची परंपरा समाजासाठी प्रेरणादायी : उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : जैन समाजाने समाज-सेवा, दानधर्म, अहिंसा आणि त्याग या मूल्यांवर आधारित कार्यातून समाजासमोर प्रेरणादायी आदर्श निर्माण केला असल्याचे प्रतिपादन उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी केले. लोकभवन येथील दरबार हॉलमध्ये संपन्न झालेल्या ६४ व्या जैन दीक्षा समारंभप्रसंगी ते बोलत होते.



या कार्यक्रमास राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, अध्यात्म परिवार ट्रस्टचे विश्वस्त व देणगीदार बाबूलालजी बन्साली, हितेंद्र माणेकजी, राजेश चंदन तसेच अध्यात्म परिवार ट्रस्टचे सदस्य उपस्थित होते.

उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन म्हणाले, जैन समाज देशभरात विविध माध्यमांतून समाजहिताचे कार्य करीत असून सेवा हीच जैन धर्माची ओळख आहे. ६४ जणांनी दीक्षा स्वीकारणे ही बाब अत्यंत प्रेरणादायी असून, त्यातून संयम, साधेपणा आणि आध्यात्मिकतेचा संदेश समाजाला मिळतो. भगवान महावीरांनी दिलेला अहिंसा, अपरिग्रह आणि अनेकांतवादाचा संदेश आजच्या काळात अधिक महत्त्वाचा ठरत असल्याचेही त्यांनी सांगितले. संवाद, सहिष्णुता आणि सर्व जीवसृष्टीबद्दल करुणा या मूल्यांमधूनच शांतता आणि शाश्वततेचा मार्ग सापडू शकतो, असेही त्यांनी स्पष्ट केले.

तमिळनाडू आणि जैन धर्म यांचे ऐतिहासिक नाते अधोरेखित करताना उपराष्ट्रपती श्री. राधाकृष्णन यांनी जैन समाजाने साहित्य, संस्कृती आणि ज्ञानसंवर्धन क्षेत्रात दिलेल्या योगदानाचे कौतुक केले. जैन तत्त्वज्ञानातील जीवनमूल्ये आजच्या समाजासाठीही मार्गदर्शक असल्याचे त्यांनी आपल्या भाषणात नमूद केले.

जैन धर्माचा संदेश शांतता, संयम व समन्वयाचा – राज्यपाल जिष्णू देव वर्मा

सध्याच्या जागतिक परिस्थितीत जैन धर्मातील मूल्ये मानवजातीला शांतता, समन्वय आणि संयमाचा मार्ग दाखवणारी असल्याचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी सांगितले. आधुनिक जीवनशैली अनेकदा ग्राहकतावाद आणि इच्छांच्या अखंड पाठपुराव्याला प्रोत्साहन देत असली, तरी भारतीय संस्कृतीने नेहमीच साधेपणा, संयम आणि आत्मत्याग यांना महत्त्व दिले असल्याचे त्यांनी सांगितले.

आजच्या भौतिकतावादी युगात विविध क्षेत्रांतील व्यक्ती दीक्षेचा मार्ग स्वीकारत आहेत, ही बाब विशेष प्रेरणादायी आहे. भगवान महावीरांच्या अध्यात्मिक पावलांवर चालत विविध जैन आचार्यांनी भारतीय संस्कृतीला चिरंतन मूल्यांनी समृद्ध केले, असे त्यांनी नमूद केले.

प्राचीन मंदिरांच्या जतन व जीर्णोद्धारासाठी जैन समाजाने पुढाकार घ्यावा – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस


महाराष्ट्रातील प्राचीन मंदिरांच्या जतन आणि जीर्णोद्धारासाठी जैन समाजाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. जैन समाजाने ज्ञान संवर्धनाबरोबरच प्राचीन वारशाच्या जतनासाठीही महत्त्वपूर्ण योगदान द्यावे. जैन समाजाच्या विविध उपक्रमांचे कौतुक करून ते म्हणाले, प्राचीन हस्तलिखितांचे जतन, संवर्धन आणि मंदिरांच्या संरक्षणासाठी होत असलेले कार्य प्रेरणादायी आहे. सुमारे सात कोटी प्राचीन हस्तलिखितांचे जतन व संवर्धन तसेच प्राचीन जैन मंदिरांच्या संरक्षणाचे कार्य संस्थेकडून करण्यात आले.

अहिंसा ही केवळ शारीरिक हिंसेपुरती मर्यादित नसून विचारांमध्येही हिंसा नसावी, हा संदेश जैन तत्त्वज्ञान देते. आजच्या भौतिक जीवनशैलीच्या युगात सर्वकाही सोडून दीक्षा घेणे हे अत्यंत मोठे आणि दृढ निश्चयाचे कार्य आहे. जैन समाजाने आपल्या कार्यातून देशासमोर एक आदर्श निर्माण केला असून, देशाच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीत मोठे योगदान देतानाच दान-पुण्याच्या क्षेत्रातही जैन समाज अग्रस्थानी असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

या कार्यक्रमात जैन समाजाच्या प्रगतीसाठी योगदान देणाऱ्या व्यक्तींचा सत्कार करण्यात आला.

भगवान महावीर यांच्या जन्मोत्सवानिमित्त – 'अष्ट द्रव्य' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जैन पूजा साहित्य प्रदर्शनास मान्यवरांनी यावेळी भेट दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी केले.

## काही ठिकाणी उष्णतेचा तडाखा, तर ७ जिल्ह्यांत गारपिटीचा धोका



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात सध्या हवामानात सतत बदल होत असून हवामानाचा खेळ पाहायला मिळत आहे. काही ठिकाणी उष्णतेची तीव्रता वाढण्याचे संकेत आहेत, तर काही भागात अजूनही वादळी पाऊस आणि गारपिटीची शक्यता कायम आहे.

अलीकडील अवकाळी पावसामुळे शेती क्षेत्राला मोठा फटका बसला आहे. अनेक ठिकाणी काढणीला आलेली पिके नुकसानग्रस्त झाली आहेत. आता ही पावसाची परिस्थिती कमी होत असली तरी उष्णतेत वाढ होण्याची चिन्हे दिसत आहेत.

कोकण किनारपट्टीवर विशेषतः दमट आणि गरम हवामान जाणवण्याची शक्यता आहे. मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या भागांत तापमानात वाढ होऊन उकाडा जाणवू शकतो. त्यामुळे नागरिकांनी उष्णतेपासून बचावासाठी काळजी घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

दुसरीकडे, विदर्भ आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये अजूनही वातावरण अस्थिर राहणार आहे. लातूर, धाराशिव, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया आणि नागपूर या भागांत वाऱ्यासह पावसाची शक्यता असून काही ठिकाणी गारपीटही होऊ शकते.

राज्यातील विविध भागांमध्ये झालेल्या गारपिटीमुळे गहू, हरभरा, कांदा, हळद तसेच फळपिकांचे नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसला असून नुकसानभरपाईची मागणी पुढे येत आहे.

दरम्यान, हवामानातील बदलामुळे काही भागात रात्रीचे तापमान किंचित कमी होण्याची शक्यता आहे. उत्तर दिशेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांचा परिणाम म्हणून काही भागात हलका गारवा जाणवू शकतो.

या पार्श्वभूमीवर पुढील काही दिवस हवामान बदलत राहण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी आणि शेतकऱ्यांनी परिस्थितीचा अंदाज घेऊन योग्य ती खबरदारी घेणे आवश्यक असल्याचे सांगितले जात आहे.

## मुंबई-अहमदाबाद हायवेवर भीषण अपघात, दुचाकीवरील तिघे ठार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पालघर: जिल्ह्यातील मुंबई-अहमदाबाद महामार्गावर दिवसभरात अपघाताच्या दोन घटना घडल्या आहेत. मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील ढेकाळे येथील वाघोबा खिंड परिसरात भीषण अपघाताची घटना घडली आहे. अज्ञात वाहनाने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने दुचाकीवरील तिघांचा जागीच मृत्यू झाला आहे.

घटनेची माहिती मिळताच महामार्ग पोलीस तत्काळ घटनास्थळी दाखल झाले असून पंचनामा आणि पुढील कार्यवाही सुरू आहे. दुसरीकडे वसईतील सुसुपाडा येथे ४ वाहनांचा (उरी ललळवशर्पी) भीषण अपघात झाला आहे. कंटेनर, दोन कार आणि एक टेम्पो अशी एकूण चार वाहने एकमेकांवर आदळल्याची घटना दुपारच्या सुमारास घडली.

ढेकाळे येथील वाघोबा खिंड परिसरात घडलेल्या अपघातात दुचाकीवरील तिघांचा मृत्यू झाला असून मृतांची ओळख पटवण्याचे काम सध्या सुरू आहे. मनोर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह ताब्यात घेऊन मनोर ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी हलवले आहेत. दरम्यान, अपघातानंतर घटनास्थळावरुन फरार झालेल्या अज्ञात वाहनाचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली असून पुढील तपास सुरू आहे.

मुंबई-अहमदाबाद महामार्गावर ४ वाहनाचा भीषण अपघात झाला. मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर वसईतील ससुपाडा परिसरात आज दुपारच्या सुमारास हा भीषण अपघात झाला. या अपघातात कंटेनर, दोन कार आणि एक टेम्पो अशी एकूण चार वाहने एकमेकांवर आदळल्याची माहिती समोर आली आहे. अपघातानंतर काही काळ महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली होती. या घटनेमुळे वाहनांच्या लांबच लांब रांगा लागून, मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतकार्य सुरू केले. तसेच पोलीस घटनास्थळी दाखल होत वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले.

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे इराणच्या राष्ट्राध्यक्षांना शांततेचे आवाहन

## कोणताही वाद हा केवळ संवाद आणि मुत्सद्देगिरीनेच सुटू शकतो

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : पश्चिम आशियामध्ये इस्रायल, अमेरिका आणि इराण यांच्यातील तणाव शिगेला पोहोचला असताना, भारताने या वादात शांतता प्रस्थापित करण्यासाठी मोठे राजनैतिक पाऊल उचलले आहे. पंतप्रधान नरेन्द्र मोदी यांनी शनिवारी इराणचे राष्ट्राध्यक्ष डॉ. मसूद पेजेश्कियन यांच्याशी फोनवरून सविस्तर चर्चा केली. गेल्या आठ दिवसांतील या दोन्ही नेत्यांमधील ही दुसरी चर्चा असून, भारताने या प्रदेशातील शांतता आणि स्थिरतेसाठी पुन्हा एकदा आग्रही भूमिका मांडली आहे. पंतप्रधान मोदींनी राष्ट्राध्यक्ष पेजेश्कियन यांना ईद-उल-फितर आणि इराणचे नवीन वर्ष नवरोज निमित्त शुभेच्छा दिल्या. 'हा सण पश्चिम आशियात शांतता, स्थिरता आणि समृद्धी घेऊन येईल,' अशी आशा पंतप्रधान मोदींनी यावेळी व्यक्त केली. या शुभेच्छांसोबत पंतप्रधान मोदींनी पश्चिम आशियात बिघडत चाललेल्या सुरक्षा व्यवस्थेवर तीव्र चिंता व्यक्त केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या संवादादरम्यान पश्चिम आशियातील बिघडत चाललेल्या परिस्थितीवर भारताची भूमिका अत्यंत स्पष्टपणे मांडली. त्यांनी प्रामुख्याने प्रादेशिक सुरक्षा, जागतिक व्यापार आणि मानवी हित या तीन गोष्टींवर भर दिला. पंतप्रधानांनी पश्चिम आशियातील महत्त्वाच्या पायाभूत सुविधांवर होणाऱ्या हल्ल्यांचा तीव्र निषेध केला. अशा हल्ल्यांमुळे केवळ प्रादेशिक स्थिरता धोक्यात येत नाही, तर जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत होऊन जगाच्या अर्थव्यवस्थेवरही विपरीत परिणाम होतो, असे त्यांनी नमूद केले. तसेच होर्मुझची सामुद्रधुनी हा समुद्री मार्ग सुरक्षित राहणे अनिवार्य असल्याचे मोदींनी सांगितले. युद्धामुळे होणारी निष्पाप नागरिकांची जीवितहानी आणि मालमत्तेच्या नुकसानीबद्दल पंतप्रधानांनी खोलवर दुःख व्यक्त केले. या कठीण काळात इराणमधील भारतीय नागरिकांची सुरक्षा आणि त्यांचे हित ही भारताची सर्वोच्च प्राथमिकता असल्याचे त्यांनी पुन्हा एकदा स्पष्ट केले.



भारताची जागतिक नेत्यांशी चर्चा

पश्चिम आशियातील संकट ओळखून पंतप्रधान मोदी सातत्याने जागतिक नेत्यांच्या संपर्कात आहेत. शुक्रवारी त्यांनी बहरीनचे राजे हमद बिन ईसा अल खलिफा यांच्याशी चर्चा केली होती. यापूर्वी त्यांनी कतारचे अमीर, जॉर्डनचे राजे आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्याशीही संवाद साधला आहे. कोणताही वाद हा केवळ संवाद आणि मुत्सद्देगिरीनेच सुटू शकतो, हे भारताचे अधिकृत धोरण असल्याचे सांगितले जात आहे.

वाढता तणाव आणि भारताची भूमिका

एकीकडे अमेरिका आणि इस्रायल इराणमधील सत्तापालटासाठी आक्रमक पवित्रा घेत आहेत, तर दुसरीकडे इराणचे नवीन सर्वोच्च नेते मोजतबा खामेनी यांनी शत्रूंसमोर न झुकण्याची शपथ घेतली आहे. अशा कठीण काळात भारत मध्यस्थाची भूमिका बजावत आहे.

# डोक्यावरचा हंडा काढा; पाणीपुरवठ्याचे नियोजन करा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

स्वयंपाकापासून ते सांडपाण्यापर्यंत घरात पाणी आहे की नाही हे पाहण्याची जबाबदारी भारतातील पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये पिढ्यानपिढ्या महिलांनी सांभाळली आहे. आजही अनेकांना आपली आई, बहीण किंवा आजी डोक्यावर हंडा, कळशी किंवा घागर घेऊन लांबवरून पाणी आणतानाचे प्रसंग आठवते. भारतात आता हे चित्र कालबाह्य झाले तरी जगभरात अधिकही अनेक देशात नागरिक शुद्ध व नियमित पाणीपुरवठ्यापासून वंचित आहेत. त्यामुळे यंदा २२ मार्चला जागतिक जल दिवस साजरा करताना संयुक्त राष्ट्राने पाणी व्यवस्थापनात महिला सक्षमीकरणाला प्राधान्य दिले आहे.

भारताने पेयजलाच्या क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे.घराघरांत नळाद्वारे पाणी पोहोचवण्यासाठी जलजीवन मिशन प्रभावीपणे राबविण्यात आले. तरीही काही भागांत पाणीटंचाई कायम आहे आणि त्याचा सर्वाधिक भार महिलांवरच पडतो. ही समस्या केवळ भारतापुरती मर्यादित नसून जागतिक पातळीवरही ती तितकीच गंभीर आहे. म्हणूनच यंदाचा जागतिक जल दिवस पाणी आणि महिला सक्षमीकरण या व्यापक संकल्पनेशी जोडून साजरा केला जात आहे.

**जलसंकट : असमानतेचा प्रश्न**

पृथ्वीवरील सुमारे ७१ टक्के भाग पाण्याने व्यापलेला असला, तरी त्यातील केवळ २.५ टक्के पाणी गोड आहे. त्यातीलही अत्यल्प भाग मानवाच्या वापरासाठी उपलब्ध आहे. त्यामुळे पाण्याची विपुलता ही केवळ भास आहे. हवामान बदल, लोकसंख्यावाढ,औद्योगिकीकरण आणि शहरीकरण यामुळे पाण्याची मागणी वाढत असताना उपलब्धतेत आणि वितरणात मोठी असमानता निर्माण झाली आहे. या असमानतेचा सर्वाधिक फटका स्त्रिया आणि मुलींना बसतो.


**पाणीटंचाईत महिलांचे सर्वाधिक शोषण**

संयुक्त राष्ट्रांच्या अहवालांनुसार, जगभरातील १ अब्जाहून अधिक स्त्रिया अजूनही सुरक्षित पिण्याच्या पाण्यापासून वंचित आहेत. सुमारे १.८ अब्ज लोकांच्या घराजवळ पाणी उपलब्ध नाही. अशा परिस्थितीत प्रत्येक तीन घरांपैकी दोन घरांमध्ये पाणी आणण्याची जबाबदारी महिलांवर असते. ५३ देशांतील आकडेवारीनुसार स्त्रिया आणि मुली दररोज एकत्रितपणे सुमारे २५० दशलक्ष तास पाणी आणण्यात खर्च करतात. ही वेळ शिक्षण, रोजगार किंवा वैयक्तिक विकासासाठी वापरता आली असती.

अशुद्ध पाणी आणि स्वच्छतेच्या अभावामुळे दररोज सुमारे १,००० बालकांचा मृत्यू होतो. याशिवाय जगातील सुमारे १४ टक्के देशांमध्ये पाणी व्यवस्थापनाच्या निर्णयप्रक्रियेत महिलांचा समान सहभाग निश्चित करणारी ठोस यंत्रणा नाही.

हे आकडे स्पष्ट करतात की जलसंकट हा केवळ नैसर्गिक प्रश्न नसून तो सामाजिक, आर्थिक आणि लिंगभेद करणारा आहे.





**महिला जलव्यवस्थापनाच्या केंद्रस्थानी हव्यात**

भारतीय संविधानामुळे स्त्री–पुरुष समानतेचा पाया मजबूत झाला आहे.आज महिला उद्योग, शिक्षण, आरोग्य अशा अनेक क्षेत्रांत नेतृत्व करत आहेत. पाणी व्यवस्थापनातही त्यांचा अनुभव अमूल्य आहे.मात्र ही स्त्री समानता आत्ता जलव्यवस्थापनातही आणणे केवळ आपल्याच देशाची नाही तर जगभराची गरज बनली आहे.

संयुक्त राष्ट्रांच्या मते, जलव्यवस्थापनात महिलांचा सहभाग वाढल्यास सेवा अधिक शाश्वत, समावेशक आणि प्रभावी ठरतात. त्यामुळे महिलांना 'पाणी आणणाऱ्या भूमिकेतून 'पाणी नियोजन करणाऱ्या भूमिकेत आणणे आवश्यक आहे.

**पाणी आणि अर्थव्यवस्था : अदृश्य नाते**

पाणी हे जीवनाचेच नव्हे तर अर्थव्यवस्थेचेही मूलभूत साधन आहे. जगभरात उपलब्ध शुद्ध पाण्यापैकी सुमारे ७० टक्के पाणी शेतीसाठी वापरले जाते, तर उद्योग आणि ऊर्जा क्षेत्रालाही मोठ्या प्रमाणावर पाण्याची गरज असते.

ज्या देशांनी प्रभावी जलव्यवस्थापन केले, तेथे आर्थिक प्रगती वेगाने झाली. इस्रायलने ठिबक सिंचन, सिंगापूरने सांडपाण्याचा पुनर्वापर, नेदरलँडने पूर नियंत्रण आणि ऑस्ट्रेलियाने जलसंधारण धोरण यशस्वीपणे राबविले. ही उदाहरणे योग्य नियोजनाचे महत्त्व अधोरेखित करतात.

**जागतिक उपाययोजना : बदलाची दिशा**

पाण्याच्या समस्येवर उपाय म्हणून विविध स्तरांवर प्रयत्न सुरू आहेत. समुद्राच्या खाऱ्या पाण्याचे गोड्या पाण्यात रूपांतर (डिसॅलिनेशन), सांडपाणी प्रक्रिया आणि पुनर्वापर, तसेच नदी पुनरुज्जीवन प्रकल्प यांवर भर दिला जात आहे.

महाराष्ट्रातील नागपूर येथे सांडपाण्याचा औद्योगिक वापर केला जातो, तर नवी मुंबईचे सांडपाणी व्यवस्थापन आदर्श मानले जाते. याशिवाय वृक्षारोपण आणि जलसंधारण हे पर्यावरणीय संतुलनासाठी अत्यावश्यक उपाय आहेत.

**पाणी अडवा – पाणी जिरवा : प्रभावी उपाय**

पावसाचे पाणी जमिनीत मुरवणे ही जलसंधारणाची सर्वात प्रभावी पद्धत आहे. यामुळे भूजल पातळी वाढते, विहिरी जिवंत राहतात आणि शेतीसाठी पाणी उपलब्ध होते.

शहरी भागातही रेनवॉटर हार्वेस्टिंग अनिवार्य करणे आवश्यक आहे. शासनाने नव्या बांधकामांसाठी ही अट बंधनकारक केली आहे, ही सकारात्मक बाब आहे.

**भारतातील प्रयत्न : धोरण आणि अंमलबजावणी**

भारत सरकारने पाणी व्यवस्थापनासाठी विविध योजना राबवल्या आहेत–जल जीवन मिशन – प्रत्येक जल जीवन मिशन, अटल भूजल योजना,जलशक्ती अभियान,स्वच्छ भारत मिशन,महाराष्ट्र ग्रामीण पाणी पुरवठा योजना,मुख्यमंत्री जलसंधारण योजना,नमामि गंगे योजना अशा कितीतरी योजनांमधून केंद्र व राज्य शासन जनतेला शुद्ध पेयजल उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करत आहे.

**प्रत्येक नागरिकाची भूमिका**

शासन स्तरावर विविध योजना राबविण्यात येत असल्या तरी सामान्य नागरिकांनीही या मोहिमेत एक जबाबदार नागरिक म्हणून पुढे येणे गरजेचे आहे.पाणी वाचवण्याची सुरुवात शासनाकडून नव्हे, तर घरापासून होते. आपण काही सोपे उपाय अवलंबू शकतो.जसे की,नळ आणि पाईप गळती त्वरित दुरुस्त करणे,रेनवॉटर हार्वेस्टिंग करणे, सांडपाण्याचा पुनर्वापर,ठिबक सिंचनाचा वापर पाण्याचा अपव्यय टाळणे,वृक्षारोपण करणे,घरातील पाणी व्यवस्थापनात महिलांचा निर्णयाधिकार मान्य करणे,पाणी हा केवळ नैसर्गिक संसाधन नसून तो मानवी हक्क, सामाजिक न्याय आणि लिंगसमतेचा आधार आहे. जलसंकटाचा विचार करताना समतेचा दृष्टिकोन आवश्यक आहे. तसा विचार रुजवणे.यासोबतच घराघरात केवळ पाण्याच्या उपलब्धतेसाठी महिलांचे शोषण होणार नाही याची काळजी घेण्याचाही आजचा दिवस आहे. चला !तर महिलांच्या डोक्यावरचा हंडा काढूया आणि जल जीवन मिशन, अटल भूजल योजना,जलशक्ती अभियान,स्वच्छ भारत मिशन,महाराष्ट्र ग्रामीण पाणी पुरवठा योजना, विविध जलसंधारण योजनेच्या माध्यमातून पाणी टंचाई मुक्त समाज निर्मितीसाठी पुढे येऊया..

# पर्यावरण संतुलनासाठी सामाजिक वनीकरण काळाची गरज

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

२१ मार्च रोजी साजरा होणारा 'जागतिक वन दिन' हा मानव आणि निसर्ग यांच्यातील दृढ नात्याची जाणीव करुन देणारा महत्त्वपूर्ण दिवस आहे. वाढत्या पर्यावरणीय आव्हानांच्या पार्श्वभूमीवर वृक्ष लागवड, संवर्धन आणि संगोपन ही गरजेबरोबरच सामूहिक जबाबदारी बनली आहे. पर्यावरणाचा समतोल आणि संतुलन राखण्यासाठी खासगी आणि सामूहिक जमिनींवर मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करुन वनांचे प्रमाण वाढवणे, जैवविविधता वाढवणे, टिकवणे आणि संवर्धन करण्यासाठी सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत..

**राज्यातील वनक्षेत्राची स्थिती**

राष्ट्रीय वननीती १९८८ नुसार एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ३३ टक्के भागावर वृक्षाच्छादन असणे आवश्यक आहे. यामुळेच पर्यावरणाचा समतोल व संतुलन राखणे तसेच संवर्धन करणे शक्य होते. महाराष्ट्रात ३०७ लाख हेक्टर भौगोलिक क्षेत्रापैकी ६१.३५ लाख हेक्टर जमीन वृक्षाच्छादित असून हे प्रमाण साधारण २० टक्के आहे.

जागतिक तापमानवाढ, वातावरणीय बदल, अनियमित पर्जन्यमान, अतिवृष्टी, दुष्काळ, ढगफुटी, महापूर यांसारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे पर्यावरणाच्या संतुलनात आणि जैवसृष्टीच्या स्थिरतेमध्ये सातत्याने बदल होत आहेत. पर्यावरणाचे असंतुलन, वाढते प्रदूषण आणि त्यातून होणाऱ्या बदलाचा थेट परिणाम मानवी जीवनावर होत आहे. या पार्श्वभूमीवर वन व वन्य जीवांचे संरक्षण, संवर्धन व संगोपनासाठी वन विभाग व वन्यजीव विभाग अत्यंत महत्वाची भूमिका बजावत आहे.

**जैवविविधतेसाठी सामाजिक वनीकरण**

सामाजिक वनीकरण विभागामार्फत खासगी आणि सामूहिक जमिनींवर वृक्ष लागवड करून वृक्षाच्छादन वाढविण्याचे काम सातत्याने केले जात आहे. राज्यात त्या त्या क्षेत्रातील मातीचा स्तर, हवामान आणि पर्जन्यमान यांचा विचार करुन स्थानिक, दुर्मिळ व औषधी वृक्षांची लागवड करण्यात येते. त्याचबरोबर व्यापारी उत्पादन वाढवण्याच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या वृक्ष लागवडीबाबत कौशल्य मिळवून देण्याचे काम सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने केले जाते. यामुळे जैवविविधता वाढविणे, टिकविणे आणि संवर्धन करणे शक्य होत आहे.

**कोल्हापूर सामाजिक वनीकरणाचा रोप लागवडीवर भर**

कोल्हापूर सामाजिक वनीकरण विभागाच्या अधिनस्त १० परिक्षेत्र कार्यालयांमार्फत २०२५ च्या पावसाळ्यात ४९ हेक्टर वनेत्तर क्षेत्रावर ५४ हजार ४३९ रोपांची लागवड करण्यात आली. या रोपांचे संगोपन व देखभाल प्रभावीपणे करण्यात येत असून जिवंत रोपांचे प्रमाण ९० टक्क्यांहून अधिक आहे, ही बाब उल्लेखनीय आहे.

**लक्षावधी रोपांची निर्मिती**

कोल्हापूर सामाजिक वनीकरण विभागामार्फत २०२६ च्या पावसाळ्यासाठी मोठ्या प्रमाणावर रोप निर्मिती करण्यात येत आहे. वन महोत्सव कालावधीत विविध शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तसेच विविध यंत्रणांना रोपे उपलब्ध करुन देण्यासाठी सुमारे ९.४३ लाख रोपांची निर्मिती केली जात आहे. यात लहान आकाराच्या पिशवीतील ८.३५ लाख आणि उंच आकाराच्या पिशवीतील १.०८ लाख रोपांचा समावेश आहे. रोपवाटिकांमध्ये आवश्यक पायाभूत सुविधा देऊन उत्कृष्ट दर्जाची रोपे तयार केली जात आहेत.

पर्यावरण जनजागृती आणि शिक्षणावर भर

केंद्र सरकारच्या पर्यावरण शिक्षण कार्यक्रमांतर्गत कोल्हापूर जिल्ह्यातील १०० हरितसेना शाळांमध्ये निसर्ग, शाश्वत विकास आणि पर्यावरणीय समस्यांबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या. सामाजिक वनीकरण विभागाच्या विविध योजना नागरिकांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रचार, प्रसिध्दी आणि जनजागृतीवर विशेष भर दिला जात आहे.

**विविध विभागांच्या समन्वयातून वृक्ष लागवड**

वैश्विक तापमानवाढ, ऋतूचक्रातील बदल आणि नैसर्गिक आपत्तींच्या वाढत्या प्रमाणामुळे मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करणे आवश्यक आहे. यासाठी पाटबंधारे, सार्वजनिक बांधकाम, कृषी विभाग, महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांसारख्या विविध विभागांच्या समन्वयातून वृक्ष लागवडीचे कार्यक्रम राबवण्यात येत आहेत. सामाजिक वनीकरण विभाग या उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करीत आहे.

**वनीकरणाचे व्यापक कार्यक्रम**

रस्ते, कालवे, रेल्वे लाईन यांच्या दुतर्फा वृक्ष लागवड, टेकड्यांचे हरितीकरण, सामूहिक पातळीवर वनीकरण कार्यक्रम तसेच 'अटल आनंद घन वन', 'पंचायत वन', 'बेल वन' आणि 'अमृत वन' यांसारख्या योजनांद्वारे व्यापक वनीकरण कार्यक्रम राबविले जात आहेत.

**लोकसहभागावर विशेष भर**

'वनमहोत्सव योजने'अंतर्गत दरवर्षी १५ जून ते ३० सप्टेंबर या कालावधीत मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड केली जाते. शासनामार्फत सवलतीच्या दरात रोपे उपलब्ध करून दिल्यामुळे नागरिकांचा सहभाग वाढत आहे. वृक्ष लागवड आणि संगोपन हा लोकांचा कार्यक्रम व्हावा, यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत.

**पर्यावरण रक्षणासाठी अनेक उपक्रम**

वाढत्या लोकसंख्येचा विचार करून पर्यावरण संवर्धनासाठी समाजातील सर्व घटकांचा सहभाग घेऊन जास्तीत जास्त रोपांची लागवड व्हावी यासाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. शेतकऱ्यांच्या शेतजमिनी, शेतीचे बांध, पडीक जमिनीवर रोजगार हमी योजना तसेच अमृत महोत्सवी फळझाड वृक्ष लागवड व फूल पीक लागवड कार्यक्रमांतर्गत वृक्ष लागवड केली जात आहे. वनेत्तर क्षेत्र वनाखाली आणण्याच्या उद्देशाने 'कन्या वन समृद्धी योजना' राबवण्यात येत असून मुलीच्या जन्मानिमित्त वृक्ष लागवड केली जाते. या योजनेअंतर्गत मुलगी जन्माला आल्यावर अशा शेतकरी दांपत्याने शासनाच्या मदतीने मुलीच्या नावे १० वृक्षांची लागवड केली जाते.

शहरी, ग्रामीण भागात प्रबोधनातून वृक्ष लागवड– हरित महाराष्ट्र या महत्त्वाकांक्षी उपक्रमांतर्गत सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायत क्षेत्रात वृक्षांची जोपासना हीच निसर्गाची उपासना ही योजना राबवली जात आहे. या संकल्पनेतून 'शुभेच्छा वृक्ष', 'शुभमंगल वृक्ष', 'आनंद वृक्ष', 'माहेरची झाडी' आणि 'स्मृती वृक्ष' यांसारख्या उपक्रमांद्वारे वृक्ष लागवड ही लोकचळवळ बनविण्याचा प्रयत्न होत आहे. तसेच शाळा व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना शालेय जीवनातच वृक्षाचे महत्त्व पटवून देण्याच्या उद्देशाने शहरी व ग्रामीण भागातील शाळा महाविद्यालयांमध्ये इको–क्लब, प्रकल्प कार्य निसर्ग कॅम्पिंग आणि मिशन लाईफ यासारखे उपक्रम राबवले जात आहेत. तसेच केंद्र शासनाच्या पर्यावरण शिक्षण कार्यक्रमांतर्गत हरित सेना शाळांमध्ये निसर्ग, शाश्वत विकास आणि पर्यावरणीय समस्यांबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी प्रबोधनपर कार्यशाळा घेतल्या जाताहेत. निसर्ग शिबिरे आणि विविध उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबद्दल जागरुकता निर्माण केली जात आहे.

राज्यातील वनक्षेत्र व वृक्षाच्छादन वाढवण्यासाठी सामाजिक वनीकरण विभाग प्रभावी प्रयत्न करत आहे. तथापि, पर्यावरण संवर्धन ही समाजातील प्रत्येक घटकाची सामूहिक जबाबदारी असून जास्तीत जास्त झाडे लावणे, त्यांचे संगोपन करणे आणि वनेत्तर क्षेत्र वनाखाली आणणे ही काळाची गरज आहे. पर्यावरणाचा समतोल, संतुलन राखण्यासाठी, जैवविविधतेचे संवर्धन करण्यासाठी आणि भावी पिढीच्या सुरक्षित भविष्यासाठी सामाजिक वनीकरण हा सर्वात प्रभावी मार्ग आहे. जागतिक वन दिनाच्या निमित्ताने हरित महाराष्ट्र ही संकल्पना साकारण्यासाठी सामाजिक वनीकरण विभागाच्या योजनांमध्ये अधिकाधिक नागरिकांनी सहभागी होणे गरजेचे आहे. चला तर मग, वृक्षारोपण करुया आणि पर्यावरणाचा समतोल राखूया !

**करमाळा-माढा तालुक्यात केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या अडचणींवर टेंभुर्णी येथे विचारविनिमय बैठक**

# केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन ठामपणे उभे : फलोत्पादन मंत्री भरत गोगावले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : अमेरिकेच्या चुकीच्या धोरणामुळे आयात–निर्यात व्यापार ठप्प झाला असून केळी उत्पादक शेतकरी पूर्णपणे अडचणीत आला आहे. उत्पादनावर खर्च जास्त असून नफा काहीच नाही. यासाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्यासोबत विशेष बैठक घेऊन ठोस निर्णय घेणे आवश्यक आहे. सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून अधिवेशनाच्या तीन दिवसांत हा प्रश्न विधिमंडळात घेतला जाईल, अशी माहिती फलोत्पादन व रोजगार हमी मंत्री भरत गोगावले यांनी दिली.

करमाळा व माढा तालुक्यातील फळबाग शेतकऱ्यांच्या अडीअडचणी जाणून घेण्यासाठी टेंभुर्णी येथे केळी फळबाग शेतकरी, व्यापारी, कंपनी प्रतिनिधी यांची विचारविनिमय बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत मंत्री श्री. गोगावले मार्गदर्शन करत होते. यावेळी आमदार अभिजीत पाटील, संजय कोकाटे, कृषी अधीक्षक शुक्राचार्य भोसले, उपविभागीय कृषी अधिकारी संजय वाकडे, तालुका कृषी अधिकारी हनुमंत बोराटे, तंत्र अधिकारी अभिजीत देडे तसेच मान्यवर, अधिकारी व शेतकरी उपस्थित होते.

कृषी विभागाने शेतकऱ्यांना पूर्ण सहकार्य करावे, तसेच केळी व द्राक्ष उत्पादकांना भाऊसाहेब फुंडकर फळबाग योजनेत सहभागी करून घेण्याबाबत चर्चा होईल. व्यापारी कंपनी व उजनी धरण पुनर्वसन संघर्ष समिती यांनी दिलेल्या निवेदनावरही विचार केला जाईल, अशी माहिती फलोत्पादन मंत्री श्री. गोगावले यांनी देऊन केळी व द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा दिला.

माढा तालुक्याचे आमदार अभिजीत पाटील यांनी शेतकऱ्यांची बाजू मांडताना सांगितले की, युद्धजन्य परिस्थिती, अतिवृष्टी, दुष्काळ यामुळे शेतकरी नेहमीच अडचणीत येतो. नाशवंत फळ ठराविक कालमर्यादेत विकले गेले नाही तर मोठे नुकसान होते. तसेच पानंद रस्ते, केळी संशोधन केंद्र व प्रक्रिया उद्योग उभारणीची गरज आहे.

प्रारंभी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी जिल्ह्यातील भाऊसाहेब फुंडकर फळबाग योजनेची माहिती देऊन जिल्ह्यातील फळबाग क्षेत्रात होत असलेले वाढीविषयी सांगितले. सोलापूर जिल्ह्यात केळी उत्पादक शेतकऱ्यांची संख्या ही मोठ्या प्रमाणावर वाढत असल्याचे त्यांनी सांगितले. सद्यस्थितीत युद्ध परिस्थितीमुळे केळी पिकाची निर्यात न झाल्यामुळे शेतकरी व व्यापारी अडचणीत आल्याचेही त्यांनी सांगितले.

या बैठकीपूर्वी मंत्री भरत गोगावले यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन फळबागांची पाहणी केली व शेतकरी, निर्यातदार, व्यापारी यांच्या व्यथा ऐकून घेतल्या.





हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई–मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे–३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# समतेचा जागर वर्षभर सुरू राहणार : डॉ हर्षदीप कांबळे



## चवदार तळे सत्याग्रह दिन बार्टीने प्रबोधनात्मक कार्यक्रमाद्वारे केला साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

महाड : भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी मानवी हक्क मिळवून देण्यासाठी चवदार तळ्याचा सत्याग्रह केला . तो लढा समतेसाठी, स्वाभिमानासाठी न्यायासाठी होता. या समतेच्या संगराला पुढील वर्षी शंभर वर्ष पूर्ण होणार आहेत. यानिमित्त वर्षभर सामाजिक न्याय विभागाच्यामार्फत समतेचा जागर सुरू राहणार, असल्याचे प्रतिपादन सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टीच्यावतीने महाड येथील राष्ट्रीय स्मारकामध्ये बार्टीच्या प्रबोधनात्मक कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

या लढ्यात सर्व जाती धर्मातील लोकांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना खंबीरपणे साथ दिली. चवदार तळ्याचा लढा हा मानव मुक्तीचा होता. चवदार तळ्यातील पाणी स्वच्छ करण्यासाठी सामाजिक न्याय विभागाच्या वतीने ५५ कोटी रुपये मंजूर केले असून ते पाणी जल शुद्ध प्रकल्पाद्वारे शताब्दी पूर्वी पिण्यायोग्य होईल. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी सामाजिक न्याय खाते कटिबद्ध असून आपण सर्वांनी डॉ बाबासाहेबाचा समतेचा लढा पुढे नेण्यासाठी आपण एकत्र येऊन पुढे नेऊया असे मत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे प्रधान सचिव डॉ हर्षदीप कांबळे यांनी बार्टी आयोजित चवदार तळे सत्याग्रह दिन अभिवादन कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना व्यक्त केले.

२० मार्च २०२६ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे संस्थेच्या वतीने महाड येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकातील सभागृहात चवदार तळे सत्याग्रह दिन अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी समाजकल्याण च्या आयुक्त तथा बार्टीच्या महासंचालक श्रीमती दिपा मुधोळ -मुंडे, अप्पर जिल्हाधिकारी डॉ.भारत कदम, उपजिल्हाधिकारी सिद्धार्थ भंडारे, उपायुक्त भंडारे, लवटे, समाजकल्याणचे सहाय्यक आयुक्त सुनिल जाधव, बार्टीच्या निबंधक डॉ सुचिता शिंदे, विभागप्रमुख रविंद्र कदम, शुभांगी पाटील, डॉ. बबन जोगदंड , आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ कांबळे पुढे बोलताना म्हणाले की, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी महाड येथे पिण्याच्या पाण्यासाठी जो सत्याग्रह केला तो सत्याग्रह नुसता पाण्याचा नव्हता तर तो स्वाभिमानाचा होता. समाजात समता प्रस्थापित करण्याचा होता. त्याच वाटेवर सामाजिक न्याय विभाग काम करत आहे सामाजिक न्याय विभागाच्यावतीने अनेक नवीन उपक्रम सुरू असून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उच्च शिक्षण घेतलेल्या लंडन स्कुल ऑफ इकॉनॉमिक्सच्या महाराष्ट्र शासनाच्यावतीने आंबेडकर अध्यासन केंद्र सुरू करण्यात येणार आहे. तिथे आपली मुले संशोधन व अभ्यास करतील. आपल्या मुलांनी

आपण यशस्वी होण्यासाठी मेहनत करा, अति मेहनत करा,कठोर मेहनत करा मेहनतीमुळेच आपण आपल्या जीवनात यशस्वी होतो.असा प्रेरक संदेश त्यांनी दिला.

यावेळी डॉ. हर्षदीप कांबळे लिखित मी महाडचे चवदार तळे बोलतोय ही अत्यंत प्रेरक अशी चित्रफीतही दाखवण्यात आली.

आभार व्यक्त करताना समाजकल्याणच्या आयुक्त तथा बार्टीच्या महासंचालक श्रीमती दिपा मुधोळ -मुंडे यांनी समाजकल्याण व बार्टीच्या विविध योजनेचा समाजातील विद्यार्थ्यांनी लाभ घेऊन उच्च शिक्षण घ्यावे, तसेच आपले भविष्य घडवावे असे आवाहान केले.

क्रांतीस्तंभ येथील मुख्यमंचावर बार्टीच्यावतीने प्रसिद्ध गायक कुणाल वराळे, शाहीर शहिद खेडकर,हर्षद कांबळे यांनी पाऊले या क्रांतीच्या भीम गीतांच्या माध्यमातून चवदार तळ्याच्या संघर्षमय आठवणीला उजाळा दिला महाड स्मारकात गायक अशोक गायकवाड यांनी 'रथ भीमाचा नेऊ पुढे'हा संगीतमय कार्यक्रम सादर केला. तसेच लेखक -दिगदर्शक-निर्माता राहुल जोंधळे लिखित 'निळी टोपी' व दर्शन महाजन निर्मित संविधानावर आधारित राष्ट्रग्रंथ हे दोन्ही ४० कलाकारांचा संच असलेले नाटके सादर केली.

बार्टी संस्थेच्यावतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर व इतर महापुरुषांचे मौल्यवान ग्रंथ सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्यात आली होते. त्याचे उदघाटनही प्रधान सचिव यांनी केले.

याप्रसंगी समाजकल्याण व बार्टीतील अधिकारी व कर्मचारी तसेच राज्यभरातून आलेले भीम अनुयायी, विविध क्षेत्रातील मान्यवर बार्टीचे समतादूत, तालुका समनव्यक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापक सुमेध थोरात, डॉ सारिका थोरात, महाड व्यवस्थापक प्रकाश जमदाडे, जनसंपर्क अधिकारी लीना कांबळे यांच्यासह बार्टीतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली.

प्रास्ताविक व सूत्रसंचालन विस्तार व सेवा विभागाचे विभागप्रमुख डॉ बबन जोगदंड यांनी केले.

## खामसवाडी येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या वतीने गुढीपाडवा प्रवेशोत्सव उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हनुमंत पाटुळे/खामसवाडी प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत गुढीपाडव्या निमित्त प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. दि २० मार्च २०२६ रोजी आयोजित कार्यक्रमात इयत्ता पहिलीच्या नवागत विद्यार्थ्यांचे आनंदाने स्वागत करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांचे औक्षण करून, त्यांच्या पायांचे ठसे घेऊन शाळेतील पहिले पाऊल जतन करण्याची अनोखी परंपरा राबविण्यात आली. नवीन



विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व गोडधोड देऊन त्यांचा उत्साह वाढविण्यात आला.

कार्यक्रमास उपस्थित पालकांनीही शाळेच्या उपक्रमांचे कौतुक करत आपल्या पाल्यांचा प्रवेश निश्चित केला. या प्रवेशोत्सवातून एकूण ३० विद्यार्थ्यांनी इयत्ता पहिलीत प्रवेश घेतला. या कार्यक्रमाला जिल्हा परिषद सदस्य श्री. विश्वास कोकणे, पंचायत समिती सदस्या श्रीम. सुवर्णाताई पाटील, गावचे सरपंच श्री. अमोल पाटील, उपसरपंच श्री. दयानंद पाटील शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजकुमार शेळके, उपाध्यक्ष श्रीनिवास झोरी, सदस्य महेश शेळके, वाजिद अत्तार ,ईश्वर डोईफोडे, पत्रकार हनुमंत पाटुळे, गोपाल शेळके व शिक्षण प्रेमी नागरिक पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील शिक्षक श्री. बाकले शिवराज, शेळके नागनाथ,लोखंडे सातलिंग,गायकवाड विश्वास, श्रीमती किरदत्त संगीता,रितापुरे रेखा,मुळे वैशाली यांनी विशेष परिश्रम घेतले.

या उपक्रमामुळे गावात शिक्षणाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून प्रवेश वाढवा अभियानाला चांगला प्रतिसाद मिळत आहे.

नवीन वर्ष, नवे स्वप्न - शिक्षणातून उज्ज्वल भविष्य अशी भावना व्यक्त करण्यात आली.

## गीतगंगा फाउंडेशनचे उद्घाटन; आरोग्य तपासणीतून जनसेवा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : वैश्विक हवामान बदलामुळे आरोग्याच्या समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. सर्वसामान्य नागरिकांना महागड्या आरोग्यसेवा परवडण्यासारख्या नाहीत. नियमित आरोग्य तपासणी हीच, निरोगी आरोग्याची जननी आहे. भविष्यात होणारे मोठे गंभीर आजार वेळेत आटोक्यात आणू शकतो. आरोग्य हीच धनसंपदा आहे हे ब्रीदवाक्य घेऊन सर्वसामान्यांना आरोग्य सेवा देण्यासाठी गीतगंगा फाउंडेशन ची स्थापना करण्यात आली आहे असे प्रतिपादन संस्थेचे चेअरमन व्यंकटेश कंची यांनी केले.

यावेळी भवानी पेठ, घोंगडे वस्ती येथील स्वामी समर्थ मंदिरात नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून रा.स्व.संघ शहर संघचालक राजेंद्र काटवे तर यावेळी व्यासपीठावर राजेंद्र काटवे, मिलिंद फडके, संजीव कालदीप, व्यंकटेश कंची, चन्नेश इंडी, सागर आतनूरे, संजय साळुंखे, चंद्रकांत कंची आदी उपस्थित होते.

गीतगंगा फाउंडेशनच्या उद्घाटना प्रसंगी आयोजित आरोग्य तपासणी शिबिरात ९० नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला होता. नागरिकांची शुगर, हिमोग्लोबिन, रक्तगट व रक्तदाब या तपासण्या कारण्यात आल्या. यावेळी नूतन पदाधिकारी यांची ओळख संस्थेचे सेक्रेटरी चंद्रकांत कंची यांनी करून दिली. या प्रामुख्याने चेअरमन म्हणून व्यंकटेश कंची, व्हाईस चेअरमन म्हणून डॉ. विनय गुंडला, खजिनदार म्हणून वेणुगोपाल उत्तूर, सह-खजिनदार म्हणून रुपाली कंची, संचालक म्हणून रत्नाकर नक्का व दिपाली कंची तर सल्लागार म्हणून अशोक संकलेचा, नंदकिशोर उदगीरी, चन्नेश इंडी, शिवानंद गंजी, दिगंबर द्यावरकोंडा, विश्वास नक्का आदी. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक वेणू गोपाल उत्तूर यांनी केले. सूत्रसंचालन चन्नेश इंडी यांनी केले तर आभार अशोक संकलेचा यांनी केले.




## पाताळेश्वर विद्यालयाचे नवोदय परीक्षेत ४ विद्यार्थी गुणवत्ता यादीत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड गुणवत्ता असते, गरज असते ती केवळ योग्य मार्गदर्शनाची आणि जिद्दीची. हेच पुन्हा एकदा पाडळी येथील पाताळेश्वर माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सिद्ध केले आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या 'नवोदय' स्पर्धा परीक्षेच्या निकालात विद्यालयाने चमकदार कामगिरी केली असून, उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा एका दिमाखदार सोहळ्यात सत्कार करण्यात आला.

**यशाची चढती कमान**

नवोदय ही अत्यंत महत्वाची समजली जाणारी परीक्षा असून, यावर्षी विद्यालयातील एकूण ९ विद्यार्थी या परीक्षेला बसले होते. यातील सर्वच्या सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, ४ विद्यार्थ्यांनी मुख्य गुणवत्ता यादीत (चशीळीं डळीीं) स्थान पटकावले आहे. ग्रामीण भागातील एकाच शाळेतून एवढ्या मोठ्या संख्येने विद्यार्थी यशस्वी झाल्यामुळे पालकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

**'मोठी स्वप्ने पहा आणि ती पूर्ण करा'**

सत्कार प्रसंगी बोलताना बाल विज्ञान विकास शिक्षण प्रसारक संस्थेचे सेक्रेटरी श्री. एस. बी. देशमुख सर यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. ते म्हणाले की,

यश कोणत्याही एका दिवसात मिळत नाही, तर त्यासाठी सातत्यपूर्ण अभ्यास आणि जिद्द आवश्यक असते. मुलांनो, परिस्थिती कशीही असली तरी मोठी स्वप्ने बघायला घाबरू नका. तुमच्या जिद्दीच्या जोरावर तुम्ही जगातील कोणत्याही ध्येयापर्यंत निश्चित पोहोचू शकता.

**यशाचा सोहळा**

विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यासाठी आयोजित या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते प्रत्येक विद्यार्थ्याला गुलाबपुष्प आणि शैक्षणिक साहित्य (पेन) देऊन सन्मानित करण्यात आले. विद्यालयाचे माजी शिक्षक श्री. एम. सी. शिंगोटे यांनीही विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे कौतुक केले. या प्रसंगी मुख्याध्यापक आर. व्ही. निकम, पालक संघाचे सदस्य कैलास रेवगडे व निवृत्ती रेवगडे यांनी विद्यार्थ्यांच्या भावी शैक्षणिक प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या.

**शिक्षक वृंदांचे परिश्रम**

या यशामागे विद्यालयातील शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन असल्याचे विद्यार्थ्यांनी नमूद केले. या आनंद सोहळ्याला संस्थेचे कोषाध्यक्ष व उपशिक्षक टी. के. रेवगडे, आर. टी. गिरी, एम. एम. शेख, सविता देशमुख, सी. बी. शिंदे, के. डी. गांगुर्डे, एस. डी. पाटोळे, आर. एस. ढोली, ए. बी. थोरे, के. पी. साठे यांच्यासह मोठ्या संख्येने पालक आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## जिल्हा परिषद कृषी समितीच्या सभापतीपदी सिद्धेश्वर आणणा कोरे यांची निवड करावी



### नंदगाव जि.प.गटातील जनतेची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस. के. गायकवाड : नुकतच पार पडलेल्या धाराशिव जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये नंदगाव जि.प. गटातून भारतीय जनता पार्टी महायुतीचे अधिकृत उमेदवार व तुळजापूर तालुक्याचे कार्यसम्राट, विकासरत्न, लोकनेते,आदरणीय आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचे निष्ठावंत विश्वासू कार्यकर्ते सिद्धेश्वर आण्णा बाजीराव कोरे हे प्रचंड मताधिक्याने विजयी झाले असून त्यांची जि.प च्या कृषी सभापती पदी निवड करावी असी मागणी नंदगाव गटातून व परिसरातील जनतेतून होत आहे.

नंदगाव जिल्हा परिषद गटातून विजयी झालेले जिल्हा परिषद सदस्य सिद्धेश्वर अण्णा कोरे हे सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील असून ग्राम पंचायतीच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षापासून ते येथील जनतेची सेवा करतात. सर्वसामान्य जनतेच्या अडीअडचणीची त्यांना जाणीव आहे.ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसी त्यांचा चांगला संपर्क आहे.त्यांनी माझी तुळजापूर पंचायत समिती सदस्य म्हणून ही तालुक्यातील जनतेची सेवा केलेली आहे.

सर्वसामान्य माणसाच्या समस्यांची त्याना जाणिव असून त्या सोडवण्यासाठी ते सतत प्रयत्न करतात.जनतेच्या आरोग्याचा प्रश्न असो किंवा गोरगरिबांसाठी,मागासवर्गीयासाठी असलेल्या वैयक्तिक लाभाच्या शासनाच्या योजना असो किंवा शेतकऱ्यांसाठी असलेल्या योजना त्या योजना त्यांना मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करतात. आमदार राणा दादा यांच्या नेतृत्वावर त्यांचा दांडगा विश्वास आहे. आदरणीय आमदार राणा दादा आणि नूतन जिल्हा परिषद अध्यक्षा अर्चनाताई पाटील यांच्या नेतृत्वाखाली निरपेक्ष भावनेने निस्वार्थीपणे जनतेची सेवा करणारा कार्यकर्ता म्हणून त्यांची जनमानसात आेळख आहे. त्यांच्या या कामामुळेच तुळजापूर तालुक्यातील नंदगाव जि.प.गटातील कार्यकर्ते पदाधिकारी जेष्ठ नागरिक शेतकरी वर्ग आदी मतदारानी फार मोठ्याअपेक्षण त्यांना निवडून दिलेला आहे.

जर त्यांना जिल्हा परिषद कृषी विभाग सभापती म्हणून संधी दिली तर अधिकाराने चांगल्या प्रकारे शेतकरी, शेतमजूरासह सर्वसामान्य जनतेची कामे करता येतील आणि त्याचा फायदा भविष्यात त्यांच्या राजकीय चळवळीला होईल. खर तर आदरणीय आमदार राणा दादा आणि अर्चना ताई पाटील यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत नवनिर्वाचित जि.प.सदस्य म्हणून नंदगाव गटातून सिद्धु अण्णा कोरे याना जनतेनी निवडून दिलेलआहे.तेंव्हा निस्वार्थी निष्ठावंत कार्यकर्ता आदरणीय सिद्धेश्वर अण्णा कोरे याना जि.प. चे कृषी सभापती पदी निवड करून काम करण्याची संधी द्यावी असी मतदार संघातून जोरदार मागणी होत आहे.

### हिंदु-मुस्लिम सलोख्यातून सर्वधर्म समभावाची शिकवण

# रिपाइं (आठवले) च्या वतीने तुळजापूर येथे महाड चवदार तळ्याचा सत्याग्रह वर्धापन दिन साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के. गायकवाड : सबंध मानवजातीस सार्वजनिक पानवट्यावर पिण्याचे पाणी मिळाले पाहिजे या मानवी हक्काच्या मागणीसाठी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी रायगडाच्या पायथ्याशी असलेल्या महाड येथील चवदार तळ्याचा ऐतिहासिक सत्याग्रह केला.या ऐतिहासिक घटनेला ९९ वर्षे पूर्ण होत असून महाड येथिल चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दीपूर्व वर्धापन दिनानिमित्त तुळजापूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) च्या वतीने आभिवादनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.





देशातील तमाम बहुजनांना सार्वजनिक पाणवठ्यावर पिण्याचे पाणी मिळाले पाहिजे या मानवी हक्काच्या मागणीसाठी रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगडाच्या पायथ्याशी वसलेल्या महाड येथील चवदार तळ्याच्या पाण्याचा ऐतिहासिक सत्याग्रह महामानव डॉ. बाबासाहेब आबेडकर यानी दि.२० मार्च १९२७ रोजी केला. या ऐतिहासिक सत्याग्रहास ९९ वर्ष पूर्ण होत असून सत्याग्रहाच्या या शताब्दी पूर्व वर्धापन दिनाचे औचित्य साधून तुळजापूर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात असलेल्या महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णा कृती पुतळ्यास रिपाइं (आठवले) चे धाराशिव जिल्हा कार्याध्यक्ष बाबासाहेब म्हस्के,जिल्हा सचिव एस.के.गायकवाड यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करून महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर व चवदार तळे सत्याग्रहाचा जय जयकार करत महाड येथील चवदार तळे सत्याग्रहाचा वर्धापण दिन साजरा करण्यात आला.

या प्रसंगी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) चे मराठवाडा प्रदेश कार्याध्यक्ष आनंद पांडागळे, तुळजापूर शहराध्यक्ष वैजिनाथ पांडागळे, रिपाइं ओबिसी अघाडीचे शहराध्यक्ष लहू घोडके, भिमराव सोनवने, महादेव सोनवने, किरण कदम, विनोद भालेकर, बळी जाधव सह कार्यकर्ते उपस्थित होते.

# आंबेडकरी विचार समाज तोडण्याचा नाही तर जोडण्याचा विचार : केंद्रीयराज्यमंत्री रामदास आठवले

## ऐतिहासिक चवदार तळे जलशुद्धीकरण प्रकल्पाच्या भूमिपूजन सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून रामदास आठवले यांचे पुन्हा ऐक्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

महाड : महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानातुन या देशा- तील सर्व समाज घटकांना; सर्व सम ाजाला जोडले आहे. त्यामुळे आमचा विचार हा तोडण्याचा नाही तर समाज जोडण्याचा विचार आहे. चवदार तळे ही समतेची क्रांतीभूमी आहे. संपूर्ण जगाला प्रेरणा देणारा चवदार तळे सत्याग्रह आहे. या ऐतिहासिक चवदार तळे आणि परिसराचा विकास करण्यासाठी राज्य सरकारने चवदार तळे विकास प्राधिकरण स्थापन केले पाहिजे. महाड ही क्रांती भूमी आहे या क्रांती भूमीतील ३०-४० एकर जागा संपादित करुन भव्य शिवसृष्टी आणि भिमसृष्टी निर्माण केली पाहिजे असे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी केले.

महाड येथील चवदार तळे सत्याग्रहाच्या ९९व्या वर्धापन दिनी महाराष्ट्र शासनाच्या वतीने ५५ कोटी खर्चाच्या चवदार तळे जलशुध्दीकरण प्रकल्पाचे भूमिपुजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज करण्यात आले. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ना. रामदास आठवले बोलत होते.

चवदार तळे सत्याग्रहाचा ९९ वा वर्धापन दिन असून चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी महोत्सवाला आजपासुन सुरुवात झाली. चवदार- तळे जलशुद्धीकरण प्रकल्प भूमिपूजन सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे, समाज कल्याणमंत्री संजय शिरसाट, रोजगार हमी योजना मंत्री भरतशेठ गोगाव- ले, खासदार सुनिल तटकरे, महिला बालविकास मंत्री आदिती तटकरे, उद्योगमंत्री उदय सामंत, राज्यसभा खासदार ज्योती वाघमारे, माजी खा- सदार धैर्यशील पाटील , आमदार प्रविण दरेकर, रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडेकर, भदंत रा- हुल बोधी महाथेरो, समाज कल्याण सचिव हर्षदिप कांबळे, समाज कल्याण आयुक्त दीपा मुधोळ मुंढे, जिल्हाधिकारी किशन जावळे ; जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड; प्रकाश मोरे सिद्धार्थ कासारे गोपीनाथ सोनवणे; मोहन खांबे सुमित मोरे आदि अनेक मान्यंवर उपस्थित होते.

या सोहळ्यास माजी खासद- ार प्रकाश आंबेडकर यांना विशेष अतिथी म्हणून निमंत्रित करण्यात आले होते मात्र त्यांनी या सोहळ्यास पाठ दाखविली. प्रकाश आंबेडकर या सोहळ्यास गैरहजर राहिल्याचे पाहून ना .रामदास आठवले यांनी पुन्हा रिपब्लिकन ऐक्याचे आवाहन केले. प्रकाश आंबेडकर यांची ताकद आणि माझी ताकद एकत्र आली तर समाजा- ची राजकीय ताकद वाढेल.समाजाच्या हिता साठी समाजाचे रिपब्लिकन ऐक्य झाले पाहिजे असे आवाहन ना. राम दास आठवले यांच्या केले.



# गुढीपाडव्यापासून वागदरीत श्री परमेश्वर रथोत्सवाला प्रारंभ; पाच दिवस धार्मिक-सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/ता. अक्कलकोट : सर्वधर्म समभावाचे प्रतीक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अक्कलकोट तालुक्यातील वागदरी येथील ग्रामदैवत श्री परमेश्वर यांच्या वार्षिक यात्रेला यंदा १९ मार्च २०२६ पासून गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर प्रारंभ होत असून पाच दिवस विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या यात्रेसाठी महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागातून हजारो भाविक दरवर्षी उप- स्थित राहतात.



नवसाला पावणारे देवस्थान म्हणून प्रसिद्ध असलेल्या वागदरी येथील श्री परम ेश्वर यात्रेला मोठी ऐतिहासिक व धार्मिक परंपरा लाभली आहे. गुढीपाडव्याच्या दिवशी पहाटे भक्तांकडून दंड नमस्कार, श्रींच्या मूर्तीला रुद्राभिषेक, लहान रथ (उचई) सुवर्ण कळसारोहण तसेच सायंकाळी रथास जागा सोडविण्याचा कार्यक्रम आणि पालखी मिरवणूक असे विविध धार्मिक विधी पार पडणार आहेत.

२२ मार्च रोजी 'दोड्डमदलसी' अर्थात रात्री गूळ-साखर वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. तर २३ मार्च हा यात्रेचा मुख्य दिवस असून दुपारी २ वाजता रथास सुवर्ण कळसारोहण करण्यात येणार आहे. सायंकाळी भव्य रथोत्सव पार पडणार असून रात्री गोंधळींचे पौराणिक नाटक आणि कन्नड सामाजिक नाटक सादर करण्यात येणार आहे. २४ मार्च रोजी सकाळी लहान मल्लांच्या कुस्त्या तर दुपारी ४ वाजता मोठ्या मल्लांच्या कुस्त्यांचे सामने रंगणार आहेत. रात्री ८ वाजता शोभेच्या दारुकामाने यात्रेची सांगता करण्यात येणार आहे. यात्रेदरम्यान भाविकांसाठी महाप्रसादाचीही व्यवस्था करण्यात आली असल्याचे यात्रा कमि टीने सांगितले आहे. दरम्यान, श्री परम ेश्वर देवस्थान येथे भव्य महाद्वार गोपूरम उभारणीचे काम अंतिम टप्प्यात आले असून रंगरंगोटी व इतर काही कामे बाकी आहेत. या कामासाठी भाविकांनी उदारहस्ते देणगी देऊन सहकार्य करावे, असे आवाहन परमेश्वर देवस्थान पंच कमिटीने केले आहे. यात्रा कमिटीचे सिद्धाराम बटगेरी व नागप्पा घोळसगांव यांनी भाविकांनी मोठ्या संख्येने उप- स्थित राहून यात्रेचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

# कळंब येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त बैठकिचे आयोजन; डी.जे.मुक्त जयंती करण्याचा घेतला निर्णय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



कळंब/प्रतिनिधी : कळंब येथील पुनर्वसन सावरगाव समता नगर येथे भीम जन्मोत्सव २०२६ म ोठ्या जल्लोषात व उत्स- ाहात साजरा करण्यासाठी समता नगर येथील तथागत बौद्ध विहार येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीच्या अध्यक्षस्थांनी भास्कर दादा सोनवणे हे उपस्थित होते. या जयंती कमिटी च्या अध्यक्ष पदी सर्वानुमते एस. एम. कांबळे यांची तर उपाध्यक्ष पदी मेजर रमेश कांबळे यांची निवड करण्यात आली. तसेच खजिनदार भाऊसाहेब आवाड, मिरवणूक प्रमुख विनोद समुद्रे, लखन अण्णा गायकवाड, बालासाहेब टोपे, प्रकाश वाघचौरे पटेकर साहेब, प्रा. अनिल जगताप सर, मुन्ना कांबळे, मार्गदर्शक आर. डि बप्पा वाघमारे, अरविंद आवाड, चंद्रकांत वाघमारे सर, घाडगे सर, सल्लगार बाबासाहेब टोपे, मुन्ना कांबळे, किशोर वाघम ारे,सदस्य सुदर्शन आवाड, सुधीर जगताप, रोहित सूर्यवंशी, अतूल टोपे, संतोष टोपे, बाळू वाघमारे, मुना वाघमारे, अतुल गायकवाड,आकाश शिनगारे,रतन आवाड,सुगत वाघमारे, मुन्ना बचूटे,दिपक टोपे, दिनेश वाघम ारे, राहूल वाघमारे, लखन हौसलंमल यांची निवड करण्यात आली. या बैठकीमध्ये विविध सामाजिक, सांस्कृतिक अशा प्रश्नाविषयी चर्चा करून एक आगळा वेगळा उपक्रम म्हणुन डी.जे.मुक्त जयंती साजरी करण्याच्या ठराव करण्यात आला. या बैठकीस ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते यांच्या सह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**जयंती अध्यक्ष पदी एस.एम. कांबळे यांची तर उपाध्यक्षपदी रमेश कांबळे यांची निवड**

# मध्यवर्ती जयंती उत्सव कमिटी नळदुर्गच्या अध्यक्षपदी सुरज कांबळे यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : डॉ.बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव कमिटी नळदुर्ग ता.तुळजापूरच्या अध्यक्षपदी युवा कार्यकर्ते सुरज कांबळे यांची बिनविरोध एकमताने निवड करण्यात आली.

भारतीय घटनेचे शिल्पकार परमपूज्य बोधिसत्व महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमि त्ताने नळदुर्ग येथील बुद्ध विहाराच्या प्रांगणात आंबेडकरी अनुयायांची एक महत्वपूर्ण बैठक संपन्न झाली असून त्या बैठकीमध्ये विविध विषयावर चर्चा करून डॉ.बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव कमिटी नळदुर्ग ची निवड करण्यात आली ती पुढील प्रमाणे अध्यक्ष सुरज कांबळे, कमिटीचे सन्माननीय सदस्य म्हणून अमर बनसोडे, दिलीप भांगे, योगेश प्रकाश बनसोडे, प्रशांत कांबळे,संतोष कांबळे आदींची निवड करण्यात आली तर जयंती उत्सव नियोजन समितीचे सदस्य म्हणून न.प.गटनेते मारुती खारवे रिपाइं(आठवले) चे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे, माजी नगरसेवक किशोर नळदुर्गकर,अँड.अभिजीत बनस- ोडे व ओमप्रकाश बनसोडे आदींची निवड करण्यात आली.



प्रारंभी तथागत भगवान गौतम बुद्ध व महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून बौद्धाचार्य दादासाहेब बनस- ोडे यांच्या मार्गदर्गनाखाली साम ुदायिक रित्या बुद्ध वंदना घेण्यात आली. यावेळी सिद्धांत बनसोडे, राज- रत्न बनसोडे, ऋषिकेश कांबळे, योगेश सुरवसे, अमोल कांबळे,योगेश दुरुगकर, प्रणाल गवळी, धम्मसागर बनसोडे, विश्वास बनसोडे,शैलेश बनसोडे साहिल बनसोडे,अमोल सुरवसे सह भीमसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निफाडला अनिल कुंदे यांच्या हस्ते पाणपोईचे उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी :उन्हाळ्याची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून प्रवाशांसाठी ठीक ठिकाणी पानपोया उभारण्यात येत आहे, तहानेने व्याकुळ झालेल्या वाटसरू, प्रवाशांसाठी हे मोलाचे योगदान ठरत आहे.

निफाड येथेही ही गरज ओळखून निफाड/पिंपळगाव टॅक्सी युनियन तर्फे नववर्षाच्या शुभमुहूर्तावर पाणपोयीची उभारणी करण्यात आली आहे, या पाणपोईचे उद्घाटन निफाड नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष तथा निफाड तालुका शिवसेना अध्यक्ष अनिल पा. कुंदे यांच्या हस्ते संपन्न झाले ,याप्रसंगी चेअरमन परसराम परदेशी, आसिफ पठाण ,दिलीप नवले, सामाजिक कार्यकर्ते वकील भाई शेख, तसेच निफाड/पिंपळगाव युनियन टॅक्सी अध्यक्ष ,उपाध्यक्ष ,पदाधिकारी सर्व सदस्य व रिक्षा अध्यक्ष बाबा जाधव, संजय शिंदे ,बजाज महाजन, अध्यक्ष पवन कायस्थ,अतुल व्यवहारे,व सर्व वाहन चालक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




**सोहळ्यानिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे भव्य आयोजन**

**लाखो भाविकांची राहणार उपस्थिती**

# धारणगाव येथे श्री कामाख्या माता मंदिर प्राणप्रतिष्ठा व पंचकुंडात्मक शतचंडी याग सोहळ्यास प्रारंभ





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यातील धारणगाव खडक येथे श्री कामाख्या माता, दश महाविद्या, नवनाथ ,बडे बाबा मच्छिंद्रनाथ, महामाया तिलस्मिया यक्षिणी ,शिव मंदिर व बानन्नविर, यांचे कृपेने व साधू संतांच्या आशीर्वादाने श्री कामाख्या माता मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळा व पंचकुंडात्मक शतचंडी याग सोहळ्या निमित्त अखंड हरिनाम सप्ताहा- चे आयोजन करण्यात आले आहे, मूर्तींची प्राणप्रतिष्ठा प,पूज्य सद्गुरू जनार्दन स्वामी महाराज यांचे कृपा पात्र शिष्य श्री प.पूज्य माधवगिरी म हाराज यांच्या शुभहस्ते होणार असून वेदमूर्ती राजाराम खोचे गुरुजी यांचे मार्गदर्शनाखाली होणार आहे.

दिनांक२०/३/२०२६ रोजी सायंकाळी चार ते सात मूर्तींची सवाद्य मिरवणूक काढण्यात आली असून, शनिवार २१/३ /२०२६ सकाळी ९ते १२ या वेळेत वेदपठण, शांतिसुक्त, प्रधान संकल्प, श्री गणेश पूजन पंचांग विधी, आचार्ययादी ऋत्विकवरण व मंडप प्रवेश वास्तुपूजन होणार आहे.

तसेच योगिनी मंडल, क्षेत्रपाल प्रधान देवता स्थापना, सायं पूजा आरती प्रसाद होणार आहे.

रविवार २२/३/२०२६ सकाळी ९ ते १२ प्रधान देवता पूजन, अभिषेक, अग्निस्थापना, शतचंदी याग प्रारंभ, होणार असून नवग्रह स्थापना सप्तशती पाठ प्रारंभ होणार आहे.

दिनांक २२/३/२०२६ रोजी दुपारी तीन ते सहा या वेळेत हवन सप्तशती पाठ, मूर्तींस जलाधिवास सायंकाळ पूजा नंतर आरती व प्रसाद वाटप होणार आहे.

सोमवार दिनांक२३/३/२०२६ रोजी सकाळी नऊ ते बारा या वेळेत वेद पठण, प्रधान देवतेस अभिषेक पूजा ,अर्चन होणार असून मूर्ती स्नपन विधी करण्यात येणार आहे ,तसेच दुपारी तीन ते सहा या वेळेत हवन मूर्तींस न्यास विधी, धान्य निवास शय्या निवास पुजा हे कार्यक्रम होणार आहे.

दि २४/३/२०२६ रोजी सकाळी नऊ ते बारा शांतीसुक्त, प्रधान देव- ता अभिषेक पूजा ,देविस कुंकूम ार्चन हवन करण्यात येणार आहे तसेच दुपारी तीन ते सहा सप्तशती पाठ हवन, दत्तयाग ,रुद्र याग ,तर सायंकाळ पूजा आरती करून प्रसाद वाटप करण्यात येणार आहे असे विविध धार्मिक कार्यक्रम याप्रसंगी होणार असून दिनांक २६/३/२०२६ रोजी सकाळी ९ ते १२ या वेळेत वेद पठण ,अभिषेक पूजा, मूर्ती स्थापना ,प्राणप्रतिष्ठा विधी मुख्य कलशारोहण, यज्ञाची पूर्णाहुती ब्राह्मण पूजन, म हाआरती आशीर्वाद कर्म समर्पण असे भव्य कार्यक्रम होणार असून याचे मुख्य यजमान प्रसाद उत्सर्ग हे आहेत ,यानिमित्त अखंड हरिनाम सप्ताहा- चे आयोजन करण्यात आले असून महाराष्ट्रातील प्रसिद्ध असे नामवंत कीर्तनकार ह भ प समाधान महाराज शर्मा, ह,भ,प,विकास महाराज देवडे, ह भ प तुकाराम महाराज मुळीक, ह भ प प्रकाश महाराज जवंजाळ, ह भ प अंकुश महाराज साखरे, ह भ प ज्ञानेश्वर महाराज जळकेकर, ह भ प बाळू महाराज गिरगावकर तसेच काल्याचे किर्तन २७/३/२०२६ रोजी सकाळी दहा ते बारा ह भ प अश- ोक महाराज ईगल यांचे होणार आहे, याप्रसंगी गायनाचार्य ह भ प निळोबा महाराज सूर्यवंशी, ह भ प रोहिदास महाराज जगदाळे, ह भ प अभिजीत देशमुख, ह भ प जनक सोळंजे, तर मृदंगाचार्य ह भ प हनुमान बापू शिंदे, ह भ प विकास महाराज बेलकर ,ह भ प प्रदीप महाराज बोराडे हे उपस्थित राहणार आहे दररोज रात्री नऊ ते अकरा या वेळेत महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे.

शुक्रवार दिनांक२७/३/२९२६ रोजी हेलीकॅप्टर द्वारे मंदिर परिसरावर पुष्प वर्षाव करण्यात येणार आहे, याप्रसंगी यज्ञाचे प्रधानचार्य वेदमूर्ती राजाराम खोचे गुरुजी , तसेच प्रसाद खोचे गुरुजी व सहकारी ब्रह्मवृंद श्रीक्षेत्र नाशिक हे उपस्थित राहणार आहे या मंदिरासाठी विशेष सहकार्य व भूदान शांताराम सुदाम जाधव श्री भागवत सुदाम जाधव यांनी केले असून या कार्यक्रमास सर्व भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या भक्तिमय सोहळ्याचा आनंद घ्यावा असे आहावान पिठाधीश्वर श्री गणेश जयराम जगताप, सौ छाया गणेश जगताप, कु, श्रद्धा गणेश जगताप ,कु. विश्वसिंग गणेश जगताप, वीर सिंग गणेश जगताप, कु, कृष्णा शांताराम जाधव समस्त जगताप व जाधव परिवाराच्याव‌तीने करण्यात आले आहे.